07 JUN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊंना अभिवादन, ज्येष्ठ शाहिरांचे पोवाडे, शिवज्योत प्रभातफेरी आणि मर्दानी खेळांचे प्रदर्शन आदी उपक्रमांमुळे वातावरण मंगलमय झाले.

विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिकारी कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात मर्दानी खेळाचे सादरीकरण करण्यात आले.

शिवाजी पेठेतील मर्दानीराजा सुहासराजे ठोंबरे आखाडा, खंडोबा–वेताळ तालीम मर्दानी खेळ पथक यांनी शाहीर मिलींद सावंत, कृष्णात ठोंबरे, वस्ताद आनंदराव ठोंबरे, किरण जाधव, सहकाऱ्यांनी सादरीकरण केले. ज्येष्ठ शिवशाहीर डॉ. राजू राऊत यांनी पोवाड्यांचे सादरीकरण केले. त्यांना अजित आयरेकर, महेश पाटील यांनी साथ लाभली. राजर्षी शाहू संग्रहालयामध्ये राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर डॉ. विनोद ठाकूरदेसाई आदी उपस्थित होते.

0 7 JUN 2024 पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज्याभिषेक दिनाची प्रभात मंगलमय

## शिवाजी विद्यापीठात शिवज्योत प्रभातफेरी, पोवाडे, मर्दानी खेळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांसह राजमाता जिजाऊ साहेब यांना अभिवादन, ज्येष्ठ शाहिरांचे पोवाडे, शिवज्योत प्रभातफेरी आणि मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके आदी उपक्रमांमुळे विद्यापीठातील सकाळ मंगलमय झाली.

शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदींनी पुष्प वाहून अभिवादन केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले. यानंतर विद्यापीठ परिसरातून शिवज्योत प्रभातफेरी काढण्यात आली.



शिवाजी विद्यापीठात आयोजित मर्दानी खेळ सादरीकरणामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनाही सामावून घेण्यात आले.

त्यानंतर मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. शिवाजी पेठेतील मर्दानीराजा सुहासराजे ठोंबरे आखाडा व खंडोबा-वेताळ तालीम मर्दानी खेळ पथक यांनी शाहीर मिलिंद सावंत, कृष्णात ठोंबरे, वस्ताद आनंदराव ठोंबरे, किरण जाधव आणि त्यांच्या आबालवृद्ध सहकाऱ्यांनी हे सादरीकरण करून उपस्थितांना खिळवून ठेवले.

या शिवराज्याभिषेक दिनाचे मुख्य आकर्षण म्हणजे ज्येष्ठ शिवशाहीर डॉ. राजू राऊत यांचे पोवाडा सादरीकरण होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवकीर्ती' हा अत्यंत श्रवणीय पोवाडा आणि शिवराज्याभिषेक दिनाची स्वरचित भूपाळी व शिव-पसायदान शाहीर डॉ. राऊत यांनी सादर केले. त्यांना अजित आयरेकर आणि महेश ऊर्फ राजू पाटील यांची साथ लाभली.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते डॉ. राऊत आणि त्यांच्या साथीदारांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संग्रहालयामध्ये राजमाता जिजाऊसाहेब यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2024
लोकमत

# विद्यापीठात घुमला पोवाडा; प्रभातफेरीसह मर्दानी खेळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ शाहिरांचे पोवाडे, शिवज्योत प्रभातफेरी, मर्दानी खेळांचे प्रदर्शनाने गुरुवारी विद्यापीठातील सकाळ मंगलमय झाली. निमित्त होते शिवराज्याभिषेक दिनाचे.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत सादर केले. यानंतर पुतळ्यापासून विद्यापीठ परिसरातून शिवज्योत प्रभातफेरी काढली. मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शिवाजी पेठेतील मर्दानीराजा सुहासराजे ठोंबरे आखाडा व श्री खंडोबा-वेताळ तालीम मर्दानी खेळ पथकाच्या शाहीर मिलिंद सावंत, कृष्णात ठोंबरे, वस्ताद आनंदराव ठोंबरे, किरण जाधव आणि त्यांच्या आबालवृद्ध सहकाऱ्यांनी हे मर्दानी



राजू राउत यांनी पोवाडा सादर केला.

खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले. राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवकीर्ती' हा पोवाडा, शिवराज्याभिषेक दिनाची स्वरचित भूपाळी व शिव-पसायदान शिवशाहीर डॉ. राजू राऊत यांनी सादर केले. त्यांना अजित आयरेकर आणि महेश ऊर्फ राजू पाटील यांची साथ लाभली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

0 7 JUN 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीला 'एम्पॉवर्ड ऑटोनॉमी' महाविद्यालय दर्जा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या शिफारशीवरून व्यवस्थापन परिषदेने 'एम्पॉवर्ड ऑटोनॉमी'चा दर्जा प्रदान केला. यानुसार केआयटीला शिवाजी विद्यापीठ आणि महाविद्यालयाची जॉईंट डिग्री प्रदान करता येईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वानुसार केआयटी महाविद्यालय भविष्यात स्वतःची पदवी बहाल करण्यासाठी मार्गक्रमण करणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच अन्य व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीत अशा आशयाचे पत्र देऊन केआयटीला सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, ज्येष्ठ विश्वस्त सचिन मेनन, भरत पाटील व रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : केआयटीला शिवाजी विद्यापीठाकडून 'एम्पॉवर्ड ऑटोनॉमी'चे पत्र प्रदान करताना कुलगुरू. सोबत संस्थेचे संचालक, अध्यक्ष व ज्येष्ठ विश्वस्त.

## नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सोपी

'एम्पॉवर्ड ऑटोनॉमी'मुळे महाविद्यालयास नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे सोपे होईल. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गोष्टींवर जास्तीत जास्त केआयटी प्रशासनाचे नियंत्रण असणार आहे. भविष्यात केआयटीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वानुसार अन्य राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सहजरीत्या प्रवेश मिळून त्यांना क्रेडिट ट्रान्सफर सुविधा मिळू शकते.

– डॉ. मोहन वनरोट्टी, संचालक केआयटी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2024
सकाळ

# विद्यापीठात बहरणार देशी झाडांची हिरवाई

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : वड, पिंपळ, कडुलिंब, रिटा अशा विविध देशी प्रजातीच्या झाडांनी शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस बहरणार आहे. या पुढील कालावधीत देशी, स्थानिक प्रजातीची झाडे लावण्यास विद्यापीठाचे अधिक प्राधान्य राहणार आहे. त्यामुळे येथील हरित परिसर विस्तारणार असून, या ठिकाणी स्वच्छ हवेचा पुरवठा वाढणार आहे.

कॅम्पसची जैवविविधता समृद्ध करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाकडून बारा वर्षांपासून स्थानिक प्रजातीची झाडे लावली जात आहेत. २०१९ च्या अहवालानुसार विद्यापीठ परिसरात सुमारे १३ हजार झाडांची वाढ झाली आहे. नव्याने सुमारे २० हजार झाडे लावली आहेत. वनस्पतीशास्त्र विभागाने ४० एकर जागेमध्ये लीड बोटॅनिकल गार्डन विकसित केले आहे. त्यामुळे शहरातील इतर परिसराच्या तुलनेत विद्यापीठ कॅम्पसमधील हवेचे पुरवठा, स्वच्छता यांचे प्रमाण अधिक आहे. शहराचे फुप्फुस म्हणून या कॅम्पसला ओळखले जाते. येथे स्वच्छ हवेचे प्रमाण आणखी वाढविण्यासाठी सातत्याने विद्यापीठाकडून प्रयत्न सुरू आहेत.

> विद्यापीठाचा परिसर अधिक हरित आणि जैवविविधतेने समृद्ध करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. जलस्वयंपूर्णतेमध्ये विद्यापीठाला यश मिळाले आहे. कॅम्पसमध्ये देशी प्रजातीची झाडे लावली जाणार आहेत.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,**
> कुलसचिव

त्यात आता कॅम्पसमध्ये होणाऱ्या नव्या इमारती, भुयारी मार्गाला जोडणारे रस्ते आदी परिसरात देशी, स्थानिक प्रजातीची झाडे लावणार आहे. त्यात कडुलिंब, रिटा, आवळा, शिरीष, चिंच, बहावा आदी झाडांचा समावेश राहणार आहे.

### विविध ९९ प्रकारची झाडे

विद्यापीठात विविध ९९ प्रकारची झाडे आहेत. सुमारे १४०० मोर, ११५ प्रकारचे पक्षी आणि ५५ प्रकारची फुलपाखरे कॅम्पसमध्ये आढळतात. दरम्यान, विद्यापीठ कॅम्पस शहराचे फुप्फुस म्हणून कार्यरत असून, तो अधिक चांगल्या पद्धतीने विकसित करण्याच्यादृष्टीने विद्यापीठ अधिक जोमाने पावले टाकणार आहे. त्याबाबतचा आराखडा बनवण्याचे काम विद्यापीठाकडून लवकरच सुरू केले जाणार आहे.

## विद्यापीठाची 'हरित' पावले

- रोज १ लाख १० हजार लिटर सांडपाण्याचा पुनर्वापर
- सात एकर परिसरातील बागेला ठिबक सिंचनद्वारे पाणीपुरवठा
- दरवर्षी पावसाच्या एकूण ३३ कोटी लिटर पाण्याची साठवणूक
- सौरऊर्जेच्या वापरातून दरवर्षी १७ लाख रुपयांची बचत
- वसतिगृहांमधील मेससाठी बायोगॅसचा वापर
- प्लास्टिकचा कमी वापर आणि कागदाचा पुनर्वापरावर भर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2024
पुढारी



# उन्हाळी सत्रातील ६४१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील आजअखेर सुमारे ६४१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, बीएड, एमएड या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीत झाल्या. दि. ५ रोजी बॅचलर ऑफ आर्किटेक्चरच्या विविध सत्रांचे निकाल घोषित झाले आहेत. निकालाची सरासरी ९.५२ इतकी आहे. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

0 7 JUN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील शिवराज्याभिषेक दिनाची प्रभात मंगलमय

## विविध उपक्रमांना उत्साही प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांसह राजमाता जिजाऊ साहेब यांना अभिवादन, ज्येष्ठशाहिरांचे पोवाडे, शिवज्योत प्रभात फेरी व मर्दानी खेळांचे प्रदर्शन आदी उपक्रमांमुळे विद्यापीठातील सकाळ मंगलमय, शिवमय झाली.

शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. मंगलदिनाच्या पार्श्वभूमीवर पुतळ्यास आकर्षक विद्युतरोषणाई व फुलांच्या माळांची आरास केली होती. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत सादर केले. यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या नेतृत्वाखाली पुतळ्यापासून विद्यापीठ परिसरातून शिवज्योत प्रभात फेरी काढली. मुख्य प्रशासकीय भवनसमोर सांगता झाली.





**कोल्हापूर १) शिवाजी विद्यापीठात आयोजित मर्दानी खेळ सादरीकरणामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनाही सामावून घेण्यात आले. २) विद्यापीठात 'शिवकीर्ती' हा स्वरचित पोवाडा व भूपाळी सादर करताना शिवशाहीर डॉ. राजू राऊत.** (छाया : पप्पू अत्तार)

**मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके**

मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शिवाजी पेठेतील मर्दानीराजा सुहासराजे ठोंबरे आखाडा व खंडोबा-वेताळ तालीम मर्दानी खेळ पथक यांनी शाहीर मिलिंद सावंत, कृष्णात ठोंबरे, वस्ताद अमरदास ठोंबरे, किरण जाधव व सहकाऱ्यांनी सादरीकरण करून उपस्थितांना खिळवून ठेवले.

**पोवाडा, भूपाळी सादरीकरण**

ज्येष्ठ शिवशाहीर डॉ. राजू राऊत यांचे पोवाडा सादरीकरण झाले. राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवकीर्ती' हा स्वरचित पोवाडा व शिवराज्याभिषेक दिनाची स्वरचित भूपाळी व शिव-स्वराज्यगान शाहीर डॉ. राऊत यांनी त्यांच्या खास शैलीत व आधुनिक डिजिटल उपकरणांच्या साथीने सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करून सोडले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संग्रहालयामध्ये राजमाता जिजाऊ साहेब यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.